दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ३९ ✻ जालना ✻ ✻ बुधवार ०९ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

## १०० वर्षांत एकदाही अमेरिकेतील वैद्यकीय परीक्षेचा पेपर का फुटला नाही?



भारतात सध्या विविध स्पर्धा परीक्षा आणि प्रवेश परीक्षांच्या पेपरफुटीचे प्रकरण जोरदार गाजत आहे. 'नीट यूजी' पेपरफुटी प्रकरणामुळे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला असून, त्यांच्या जागी प्रल्हाद जोशी यांनी शिक्षण मंत्रालयाची धुरा सांभाळली आहे. महाराष्ट्रातही शिक्षक पात्रता परीक्षा आणि 'एमपीएससी'च्या औषध निरीक्षक परीक्षेत मोठे गैरप्रकार समोर आले आहेत. विशेषतः एमपीएससीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा यात सहभाग उघडकीस आल्याने उमेदवारांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून ठिकठिकाणी मोर्चे निघत आहेत. झारखंडसह अनेक राज्यांत मागील दहा वर्षांतील परीक्षांचे ऑडिट सुरू झाले आहे. भारतात पेपरफुटी ही सामान्य बाब बनत चालली असताना, जगात तंत्रज्ञानात आघाडीवर असलेल्या अमेरिकेत या परीक्षा कशा घेतल्या जातात आणि तिथे कधी पेपर फुटतात का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अमेरिकेतील 'एम-सीएटी' परीक्षा कशी असते?

अमेरिकेत वैद्यकीय शिक्षणासाठी 'मेडिकल कॉलेज डमिशन टेस्ट' म्हणजेच 'एम-सीएटी' ही परीक्षा द्यावी लागते. ही असोसिएशन ऑफ अमेरिकन मेडिकल कॉलेजे द्वारे घेतली जाणारी एक अत्यंत महत्त्वाची संगणक-आधारित परीक्षा आहे. अमेरिकेत राहणाऱ्या 'स्मिता' यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून या परीक्षेच्या पारदर्शकतेबद्दल सविस्तर माहिती शेअर केली आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याचा स्वतंत्र पेपर: परीक्षा केंद्रावर एकाच वेळी परीक्षा देणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रश्नपत्रिका संच वेगळा असतो. त्यामुळे कॉपी करणे किंवा प्रश्न लीक होणे अशक्य होते.

कडक कायदेशीर कराराचे बंधन: परीक्षा देऊन बाहेर पडल्यानंतर विद्यार्थी कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर (उदा. Whats-pp, Reddit, Telegram), मित्रांशी किंवा कोचिंग क्लासेससोबत प्रश्नांची चर्चा करू शकत नाहीत. यासंदर्भात त्यांच्याकडून कायदेशीर करार करून घेतला जातो.

**कठोर शिक्षेची तरतूद:** जर एखाद्या विद्यार्थ्याने नियमांचे उल्लंघन करून प्रश्न शेअर केले, तर त्याला परीक्षेवर कायमची बंदी घातली जाते किंवा त्याच्यावर गंभीर कायदेशीर कारवाई केली जाते.

# मराठवाड्यासाठी दोन दिवस मंत्रिमंडळ बैठक घ्या; दुष्काळ, सिंचनासाठी ठोस निर्णय करा : डॉ.लाखे पाटील

जालना (प्रतिनिधी) : मराठवाड्याच्या वाढत्या दुष्काळी संकटाची तातडीने दखल घेऊन १७ सप्टेंबरच्या हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे किमान दोन दिवसांची विशेष मंत्रिमंडळ बैठक आयोजित करावी, तसेच या बैठकीत मराठवाड्यातील दुष्काळ, पाणी, सिंचन आणि विकासाच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेऊन भरीव आर्थिक तरतुदी कराव्यात, अशी जोरदार मागणी मराठवाडा अनुशेष निर्मूलन आणि विकास मंचाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात डॉ. लाखे-पाटील यांनी मुख्यमंत्री तथा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे पाठवण्यात आलेल्या निवेदनातून मराठवाड्याच्या गंभीर परिस्थितीकडे सरकारचे लक्ष वेधले आहे.

डॉ. लाखे-पाटील यांनी ई-मेल द्वारे पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २८ जून रोजी पाठविलेल्या ई-मेलद्वारे दुष्काळ व्यवस्थापनाच्या अद्ययावत मार्गदर्शक तत्त्वांमधील वैधानिक तरतुदींचे पालन करून दुष्काळ निर्धारणाची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी यापूर्वीच करण्यात आली होती. अतिवृष्टीमुळे निर्माण होणारी परिस्थिती, पीकविमा आणि शेतकरी-कष्टकऱ्यांच्या जीवन-मरणाशी संबंधित



प्रश्नांवर तातडीने बैठक घेऊन ऑगस्टअखेरपर्यंत लवकरचा दुष्काळ जाहीर करण्याचे नियोजन करावे, अशीही मागणी त्यांनी केली होती. याच मागणीसाठी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांनाही पत्र देऊन पाठपुरावा करण्यात आला. मात्र, संबंधित ई-मेल आणि पत्र सचिव, मदत व पुनर्वसन विभागाकडे पुढे पाठविण्यात आल्याची केवळ पोहोच मिळाली असून अद्याप ठोस निर्णय झालेला नाही, अशी खंत डॉ. लाखे-पाटील यांनी व्यक्त केली आहे.

मराठवाड्यात दुष्काळाचे सावट गडद होत असताना शेजारच्या कर्नाटक राज्याने दुष्काळ निर्धारणासाठीच्या वैधानिक निकषांचा आधार घेत शंभरपेक्षा अधिक तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केल्याचा दाखला डॉ. लाखेपाटील यांनी दिला आहे. आवश्यकतेनुसार दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या वाढविण्याची भूमिकाही कर्नाटक सरकारने घेतल्याचे त्यांनी नमूद केले. एका बाजूला शेजारील राज्य आपत्तीग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी निर्णय घेत असताना महाराष्ट्रात मात्र (पान २ वर)

## पत्रकारांच्या समस्या नियमानुसार सोडविण्यास प्राधान्य:उपसंचालक प्रवीण टाके



जालना/प्रतिनिधी : बदलत्या माध्यमविश्वात पारंपरिक पत्रकारितेसोबतच डिजिटल माध्यमांचे महत्त्व वाढले आहे. पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. पत्रकारांच्या विविध समस्या व मागण्यांवर नियमानुसार योग्य कार्यवाही करून त्या सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही छत्रपती संभाजीनगर विभागाचे माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी दिली. उपसंचालक प्रवीण टाके यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल भवन येथे जालना जिल्ह्यातील पत्रकार व संपादकांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी अरुण सूर्यवंशी, सहायक संचालक सुरेश पाटील यांच्यासह विविध दैनिके, साप्ताहिकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत पत्रकारांनी ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील प्रलंबित प्रकरणे, अधिस्वीकृती पत्रिका, शासकीय कार्यक्रमांचे पास, जाहिरातींचे वितरण, तसेच शासकीय बातम्या व माहितीच्या वितरणातील समन्वय याबाबत सूचना व अपेक्षा मांडल्या. यावेळी श्री. टाके यांनी पत्रकारांच्या सूचना व समस्यांची नोंद घेत संबंधित प्रकरणांची नियमानुसार तपासणी करून (पान २ वर)

## जालन्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीवर कारवाई; १२ गुन्ह्यांत ६ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

जालना : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जालना पथकाने जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री तसेच वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबवून १२ गुन्हे दाखल केले असून, एकूण ६ लाख ६५ हजार १४९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या आदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाने दि. ६ ते ७ सप्टेंबर २०२६ दरम्यान ही कारवाई करण्यात आली. दोन दिवसांच्या या मोहिमेत अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले. यामध्ये चापडगाव, घणसावंगी, माळी, पाळवाडी, परतूर, भोरखेडा, देवखेडा, भोकरदन, धोत्रेखेड, देवगाव, माहोरा, बदनापूर, कैकाडी मोहल्ला, वाडीवाडी तांडा, सावखेडा, हॉटेल साई दरबार, एमआयडीसी जालना, जाधव ढाबा, दूधना फाटा, अंबड-केदारनगर,



बदनापूर तसेच मयूर पान सेंटर आदी ठिकाणी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईनंतर आज (दि.८) रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक व दुय्यम निरीक्षकांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बैठकीत जिल्हाधिकारी मित्तल यांनी जिल्ह्यातील अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच अवैध मद्य (पान २ वर)

## कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ करा : न्यायमूर्ती संदीप शिंदे

छत्रपती संभाजीनगर, :- उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ व संबंधित पुराव्यांची नियमानुसार पडताळणी करून पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ व पारदर्शकपणे करावी, असे मार्गदर्शन न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांनी आज केले. कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबतच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यासाठी न्यायमूर्ती श्री.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्यप्रणालीद्वारे बैठक झाली. विभागीय आयुक्त कार्यालयातून न्यायमूर्ती शिंदे यांनी बैठकीस मार्गदर्शन केले. यावेळी विभागीय आयुक्त



जी. श्रीकांत, सह आयुक्त मंजूषा मिसकर, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष व सदस्य दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. बैठकीत उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ पडताळणी, प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती तसेच स्थानिक पातळीवरील यंत्रणांच्या भूमिकेचा आढावा घेण्यात आला. उपलब्ध नोंदींच्या आधारे पात्र प्रकरणांची कार्यवाही नियमानुसार करण्याबाबत न्यायमूर्ती शिंदे यांनी मार्गदर्शन केले. हैदराबाद गॅझेटच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीत शासन निर्णयातील तरतुदींचा विचार करून आवश्यक (पान २ वर)

## वायाळ पांगरी येथील शा.व्य.अध्यक्षपदी अशोक वायाळ यांची बिनविरोध निवड



मंठा/प्रतिनिधी : मंठा तालुक्यातील वायाळ पांगरी येथे शालेय कामकाजामध्ये अधिक सुव्यवस्था निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि शाळेच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. शालेय व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनिमित्त आयोजित कार्यक्रमास पालक, नागरिक तसेच शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच शाळेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, लोकवर्गणीच्या माध्यमातून शाळेच्या विकासासाठी निधी उभारणे, क्रीडा सुविधा, भौतिक सुविधा तसेच विद्यार्थ्यांचे आरोग्य या महत्त्वपूर्ण विषयांवर उपस्थितांनी आपली मते मांडली. शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या (पान २ वर)

## परतूरच्या व्यापारी गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर



परतूर, जि. जालना : परतूर शहरातील व्यापारी बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या व्यापारी गणेश मंडळाच्या सन २०२६ च्या नवीन कार्यकारिणीची निवड नुकतीच सर्वानुमते करण्यात आली. आगामी गणेशोत्सव अधिक उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा निर्धार यावेळी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी व्यक्त केला.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळाच्या झालेल्या बैठकीत सर्वानुमते नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी वैभव सोमाणी यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी सचिन खैरे व वैभव अंभुरे, सचिवपदी कुणाल शहाणे, सहसचिवपदी सौरभ बगडिया, कोषाध्यक्षपदी शैलेष भंडारी तर कार्याध्यक्षपदी गोविंद मूंदडा यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या माध्यमातून यंदाचा गणेशोत्सव धार्मिक उत्सवापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष वैभव सोमाणी यांनी यंदाच्या गणेशोत्सवाच्या नियोजनाची माहिती देताना गणेशोत्सव हा केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नसून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. यंदा मंडळाच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, आकर्षक व सामाजिक संदेश देणारी सजावट तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. पर्यावरणाचे संरक्षण आणि नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक उत्सवाबाबत जनजागृती करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

## गणेशोत्सवासाठी बदनापूर न.पं.ची प्रशासनिक तयारी; अधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्या

**बदनापूर/नवनाथ गव्हाणे** : गणेश उत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर बदनापूर शहरातील गणपती विसर्जनाची व्यवस्था सुरळीत पार पाडण्यासाठी नगरपंचायतीने विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदाऱ्या



सोपविल्या आहेत. याबाबतचा आदेश नगरपंचायतीच्या वतीने ८ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आला आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील स्वच्छता, खड्डे बुजविणे, उड्डाणपुलाखालील नाल्यांची बंदिस्त व्यवस्था तसेच विसर्जनस्थळी कृत्रिम तलाव उभारण्याची जबाबदारी स्वच्छता निरीक्षक तथा नोडल अधिकारी रवि देशपांडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तसेच विसर्जनस्थळी जहाज व होडीची व्यवस्था आणि अनुभवी पोहणाऱ्या व्यक्तींचे नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पाणीपुरवठा अभियंता सतीश वाकडे यांना विसर्जन मिरवणूक मार्गावरील पाण्याच्या पाइपलाइनची पाहणी करून गळती आढळल्यास तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तर लेखापाल चंदेश तायडे यांच्यावर विसर्जन मार्गावरील विद्युत पोल, तारा व डी.पी.ची पाहणी करून धोकादायक डी.पी. व तारा विद्युत वितरण कंपनीकडून बंदिस्त करून (पान २ वर)

## लखन तुरे हत्या प्रकरणातील दोन आरोपींना घाणेवाडी शिवारातून अटक

### चंदनझिरा पोलिसांची मध्यरात्री कारवाई; चारही आरोपी पोलिसांच्या ताब्यात



जालना, प्रतिनिधी : जालना शहरातील लखन छगनलाल तुरे (वय ३८, रा. संभाजीनगर) यांच्या हत्या प्रकरणातील फरार दोन आरोपींच्या मुसक्या आवळण्यात चंदनझिरा पोलिसांना यश आले आहे. शुभम काकासाहेब जोगदंड आणि किशोर देवीदास जोगदंड या दोघांना राजूर रोडवरील घानेवाडी शिवारातील एका शेतातून मध्यरात्री ताब्यात घेण्यात आले. गेल्या तीन दिवसांपासून पोलिसांची पथके आरोपींच्या शोधात विविध जिल्ह्यांत फिरत होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास जालना शहरातील ढवळेश्वर परिसरात पैशांच्या देवाणघेवाणीच्या कारणावरून लखन तुरे यांना चौघांनी लाथाबुक्क्यांनी तसेच सिमेंटच्या गट्टूने मारहाण करून गंभीर जखमी केले होते. त्यांना उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना दि. ७ सप्टेंबर रोजी त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर या प्रकरणातील शुभम काकासाहेब जोगदंड आणि किशोर देवीदास जोगदंड हे दोघे जालना शहरातून पसार झाले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक तेजवीर सिंह संधू व अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांनी आरोपींना तातडीने अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार चंदनझिरा पोलीस ठाण्याचे निरीक्षक किरण बिडवे यांच्या नेतृत्वाखाली दोन स्वतंत्र तपास पथके तयार करण्यात आली.

या पथकांनी नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, सिन्नर, अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर, शिर्डी, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील (पान २ वर)

## विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी गंगाधर दाभाडे



बदनापूर /नवनाथ गव्हाणे : विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी गंगाधर पंढरीनाथ दाभाडे यांची बिनविरोध निवड झाली. निवडीनंतर गावकरी व सोसायटीच्या सभासदांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोसायटीचे पदाधिकारी, सभासद तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# संपादकीय

## खाजगी क्षेत्राचे भले अंतीरम धोक्याचेच

भारतीय अवकाश संशोधन केंद्राच्या (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) संभाव्य खासगीकरणाबाबत भूमिका स्पष्ट करा अशी मागणी या विज्ञान संस्थेच्या सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सर्व संघटनांनी केली आणि अशी काही खासगीकरण योजना विचारात असल्याचा इन्कार 'इस्रो' व्यवस्थापनाकडून आला. कर्मचाऱ्यांची खासगीकरणाची भीती निराधार नाही. तीस निमित्त ठरले ते अवकाश क्षेत्रात खासगी उद्योगांस वाव देण्यासाठी स्थापण्यात आलेल्या नव्या केंद्राचे- म्हणजे 'इंडियन नॅशनल स्पेस प्रमोशन अँड ऑथोरायझेशन सेंटर' ऊर्फ 'इन-स्पेस'- प्रमुख पवन गोएंका यांचे विधान. ''उपग्रह प्रक्षेपणाचे काम कालाच्या ओघात 'इस्रो' करणार नाही; ती जबाबदारी खासगी कंपन्यांकडे जाईल'', असे गोएंका म्हणाले आणि त्यानंतर लगेच या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या नऊ संघटनांनी 'इस्रो'च्या भवितव्याबाबत सरकारला थेट विचारणा केली. गेल्या महिन्यात भारतातील पहिला खासगी प्रक्षेपक 'विक्रम १' अवकाशात झेपावत असताना 'इस्रो'तील शंभराहून अधिक शास्त्रज्ञांच्या राजीनाम्याची बातमी आली. त्याआधी सहा वर्षे भारत सरकारने अवकाश संशोधनाचे क्षेत्र खासगी गुंतवणुकीसाठी खुले केले आणि गेल्या काही वर्षांत 'स्कायरूट', 'अग्निकुल कॉसमॉस', 'पिक्सेल', 'बेलाट्रिक्स एअरोस्पेस', 'ध्रुव स्पेस', 'दिगंतारा' आदी खासगी लहान-मोठ्या कंपन्या या क्षेत्रात अवतरल्या. गेल्या महिन्यात प्रक्षेपित झालेले 'विक्रम १' ही 'स्कायरूट' या खासगी कंपनीची निर्मिती. आज लहानमोठे असे ४०० स्टार्ट-अप्स या क्षेत्रात आहेत. पण त्याबाबत पाठ थोपटून घेता येणार नाही. कारण यातील एकही नवउद्यमी अवकाशविषयक मूलभूत वा दीर्घकालीन संशोधनात नाही. या नवउद्यमींचा भर आहे तो संदेशवहन, हवामान अंदाज इत्यादी पृथ्वीलगतची कामे करून चार पैसे मिळवणे; यावर. 'चंद्रयान' वा 'मंगलयान' असे गुंतागुंतीचे, लांब पल्ल्याचे उपग्रह प्रक्षेपक अवकाशात पाठवण्यासाठी बौद्धिक आणि आर्थिक कुवत या खासगी नवउद्यमींकडे नाही. दुसरे असे की केवळ प्रक्षेपक (रॉकेट) उडवणे वा लहानसे उपग्रह अवकाशात धाडणे ही कामे आपले 'आयआयटी'तील विद्यार्थीही आता करतात इतके ते सर्रास झाले आहे. पण अवकाश संशोधनाचे तसे नाही. ते दीर्घसूत्री असते आणि त्यामुळे गुंतवणुकीवर झटपट परतावा मिळत नाही. त्यासाठी 'इस्रो'सारखी भरभक्कम संस्थाच हवी. पण संशोधनाचे मूलभूत कार्य 'इस्रो'ने करायचे आणि त्याची आर्थिक फळे मात्र खासगी क्षेत्राने चाखायची असे टिकले तर या खासगीकरणाच्या धोरणाने होईल किंवा काय असा प्रश्न. विद्यमान सरकारचा इतिहास लक्षात घेता तो पडणे अजिबात गैर नाही. विमानतळ असो वा लष्करी विमान निर्मिती. यात नवी काही संस्थात्मक उभारणी करण्याऐवजी आहे त्या संस्था खासगी हातात देण्याचा सपाटा या सरकारने लावलेला आहे. त्यातही ज्या क्षेत्राकडे काही विशिष्ट 'अ'द्योगपतींची नजर जाते त्या क्षेत्राच्या खासगीकरणाची चर्चा सुरू होते, हाही एक महत्त्वाचा योगायोग. अवकाश, अणुऊर्जा निर्मिती यांबाबत नेमके हेच होताना दिसते. यामागील प्रमुख कारणे दोन. पहिले म्हणजे या अशा मूलभूत दीर्घकालीन संशोधनासाठी आर्थिक गुंतवणूक करण्याची ऐपत सरकारची नाही. ती ऐपत नाही कारण देशातील ८० कोटी नागरिकांस दरमहा मोफत किराणा पुरवणे, खते-रसायनांवर अनुदाने वाढवणे इत्यादी 'जनकल्याण' (?) योजनांवर होत असलेला प्रचंड खर्च. या अशा लोकानुनयी योजना अमलात आणणे म्हणजे दुचाकी चालवणे. अशा फालतू योजना चालू राहण्यासाठी सतत पॅडल मारावे लागते. अन्यथा दुचाकीवरून पडणे अटळ. सरकार तो धोका पत्करू शकत नाही. आणि दुसरे कारण म्हणजे अमेरिकेच्या 'नासा'प्रमाणे 'इस्रो'चे यश दाखवत 'आमच्याकडेही किती खासगी अवकाशयात्री उद्यमी आहेत' हे मिरवण्याची सरकारची हौस. भारत ही स्टार्टअपभूमी हे आपल्या उच्चपदस्थांचे आवडते तुणतुणे. यातील किती नवउद्यमी यशस्वी म्हणावेत असे टिकले हे नव्याने सांगण्याची गरज नाही. पण तरी सरकारची ही नवउद्यमींच्या कौतुकाची हौस काही फिटत नाही. अमेरिकेत अवकाश क्षेत्रात खासगी कंपन्या यशस्वी ठरल्या कारण मुळात त्या देशाने या क्षेत्रात केलेली प्रचंड गुंतवणूक. आपण त्याच्या पासंगासही पुरणारे नाही. त्यामुळे अवकाशाच्या आडातच फार काही नसेल तर त्या आडातल्या पाण्यावर जगू पाहणार्या नवउद्यमींच्या पोहर्यात असून असून किती आणि काय असणार, हा प्रश्न. या अवकाश नवउद्यमींच्या बाता आपण कितीही माराव्यात. पण 'इस्रो' वगळता एकाही नवउद्यमीकडे अवकाश प्रक्षेपणासाठी आवश्यक पायाभूत सोयीसुविधा नाहीत की १० हजार किलो इतके तगडे उपग्रह सोडण्याची क्षमता नाही. या सगळ्यासाठी हे नवउद्यमी वापरणार 'इस्रो'च्या सोयीसुविधा आणि वर या सरकारी आस्थापनेच्या खांद्यावरून आपल्या खासगी यशाचे गोडवे गाणार. बरे; अशी कमाई 'इस्रो' करू शकत नाही; असेही नाही. पण आताचे सरकार त्यांस कामाचा आनंदही देण्यास तयार नाही. अलीकडे तर विज्ञान आणि उच्च तंत्रज्ञान यावरील आपली तरतूद आफ्रिकी देशांची बरी म्हणावी इतकी दिव्य आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या एक टक्काही खर्च आपण या उच्च विज्ञानावर करत नाही. अशा परिस्थितीत राबवले जाणारे खासगीकरण हे विचारपूर्वक आखलेले धोरण नाही. पोटच्या पोरांस पोसता येत नाही म्हणून त्यांचे दत्तकविधान करण्यात ज्याप्रमाणे औदार्य नसते त्याप्रमाणे अवकाशादी क्षेत्र खासगी कंपन्यांस खुले करण्यात मोठेपणा नाही. ती सरकारी अपरिहार्यता आहे. वर पुन्हा आपली भयाण नोकरशाही. सरकारी बाबूगिरीमुळे शास्त्रज्ञांस त्यांना मंजूर झालेला निधीही खर्च करता येत नाही. त्यावर गतसाली संसदीय समितीने नेमके बोट ठेवले. तरीही त्यात काडीचाही बदल झालेला नाही. या समितीने भारतातील उपग्रह प्रक्षेपण केंद्रांच्या अत्यंत मर्यादित संख्येवरही भाष्य केले. त्यात आपला 'पोलर सॅटेलाईट लाँच व्हेईकल' (पीएसएलव्ही) प्रक्षेपक विस्तार तांत्रिक संकटामुळे लांबला आणि परिणामी अत्यंत महत्त्वाकांक्षी मानली जात असलेली 'गगनयान' मोहीम पुढे ढकलण्याची वेळ आपणावर आली. त्यामुळेच या संस्थेतील जवळपास शंभरभर शास्त्रज्ञ/तंत्रज्ञांनी तेथून काढता पाय घेतला. अशा परिस्थितीत होणारे हे खासगीकरण '(सरकारी) माय मरो आणि (खासगी) मावशी जगो' या धाटणीचे आहे. केंद्र सरकारच्या अखत्यारीतील 'महानगर टेलिफोन निगम', मुंबई महापालिकेची 'बेस्ट', राज्य सरकारची परिवहन सेवा आदी अशाच बोगस खासगीकरणाचे बळी आहेत. खासगी क्षेत्र हवेच. पण उत्तम सरकारी संस्था रसद तोडून मारायच्या आणि खासगी क्षेत्राचे भले करायचे हे अंतिमत: धोक्याचे ठरेल.

# आयुष्य एक चकवा!





घरं म्हातारी होतात की माणसं, हा प्रश्न मला नेहमी पडतो. भिंती तशाच असतात. देवघरातला दिवा तसाच तेवत असतो. अंगणातलं तुळशीवृंदावन तसंच उभं असतं. बदलतो तो फक्त आवाजांचा पोत. एकेकाळी खेळण्यांचा खडखडाट, अभ्यासाचे आवाज, रुसवे-फुगवे, पाहुण्यांची वर्दळ यांनी भरून गेलेलं घर... एका टप्प्यावर इतकं शांत होतं की घड्याळाची टिकटिकही बोलकी वाटू लागते. जीवन कदाचित असंच असावं. भरती-ओहोटीच्या समुद्रासारखं. कधीकाळी दोन जीवांनी संसाराची एक छोटी होडी पाण्यात सोडली होती. त्यांना किनारा कुठे आहे, याची कल्पना नव्हती; पण एकमेकांचा हात होता. एवढीच त्यांची श्रीमंती. नंतर त्या होडीत लेकरं चढली. त्यांच्या हसण्याने होडी भरली. त्यांच्यासाठी आई-बापांनी स्वतःची स्वप्नं किनाऱ्यावर ठेवली. अनेक वर्षे त्यांनी वल्ही मारल्या; स्वतःच्या थकव्याची दखल न घेता. लेकरं मोठी झाली. एके दिवशी ती आपापल्या किनाऱ्यावर उतरली. हे निसर्गाचं तत्त्व आहे. पक्षी पंख फुटल्यावर घरट्यात राहत नाहीत. नदीचं पाणीही एकाच वळणावर थांबत नाही. मात्र, घरटं तिथेच राहतं.

आजच एक फेसबुक वर पोस्ट वाचली.. सुवर्णमहोत्सवी विवाहदिन. दोन वृद्ध मनांनी फार मोठी अपेक्षा केली नव्हती. घरात सगळे जमतील, दोन शुभेच्छा मिळतील, एवढंच. पण आयुष्याला नाट्यमय वळणं फार सहज देता येतात. फोनवर मुलाचा आवाज आला आई, आज आमचा बाहेरचा कार्यक्रम आहे... तुम्ही जेवून घ्या... औषधं वेळेवर घ्या... किती साधं वाक्य! आणि किती खोल!

त्या वाक्यात काळजी होती; पण वेळ नव्हता. प्रेम होतं; पण उपस्थिती नव्हती. फोन संपला. क्षणभर शांतता पसरली. त्या शांततेत दोष नव्हता. कारण प्रेम करणारी माणसं दोष मोजत नाहीत; ती फक्त रिकाम्या जागा जपून ठेवतात. तो तिच्याकडे पाहत राहिला. ती त्याच्याकडे. मग ती म्हणाली, आजचा दिवस दुसऱ्यांनी आपल्याला द्यायचा नसतो... तो आपण स्वतः जगायचा असतो. हे वाक्य ऐकल्यावर मला जाणवलं- वार्धक्य म्हणजे वय नव्हे; तर अपेक्षांना हळुवारपणे निरोप देण्याची कला. त्या रात्री ते दोघे गाडी काढून हॉटेलमध्ये गेले. एकमेकांसमोर बसले. कदाचित पन्नास वर्षांनंतर प्रथमच. आज ते आई-बाबा नव्हते. आजोबा-आजी नव्हते. कोणाचे आधारस्तंभही नव्हते. ते फक्त नवरा आणि बायको होते. आणि कदाचित पन्नास वर्षांपूर्वीचा तो पहिला दिवस त्यांच्या डोळ्यांत पुन्हा उजाडला असावा. रात्री उशिरा मुलाला सत्य समजलं. 50th Wedding -nniversary. काही शब्द डोळ्यांना दिसत नाहीत ; ते मनाला टोचतात. मुलाने फोन केला. उत्तर आलं- आम्ही लोणावळ्याला निघालोय... तुम्ही शांत झोपा. मला त्या वाक्यात राग ऐकू आला नाही. फक्त एक परिपक्व विराम ऐकू आला. आयुष्याचा. बहुधा प्रत्येक संसार शेवटी इथेच येऊन पोहोचत असावा. प्रवासाच्या सुरुवातीला दोन माणसं असतात. मधे अनेक नाती जन्म घेतात. आणि शेवटी पुन्हा तीच दोघेच उरतात. बाकी सगळे प्रवासी असतात. आपण मात्र अनेकदा प्रवाशांना इतकं जपतो की, मूळ सहप्रवाशाचाच हात सुटत चालला आहे, हे लक्षात येत नाही. आयुष्याचा चकवा हाच असावा. आपल्याला वाटत राहतं की आपण सतत पुढे चाललो आहोत. प्रत्यक्षात मात्र आपण एका वर्तुळात फिरत असतो. सुरुवातीला ज्या हातात हात दिला होता, शेवटी पुन्हा त्याच हाताचा आधार लागतो. बाकी सगळं- घर, पैसा, प्रतिष्ठा, मुलं, यश, अपयश-हे प्रवासातील सुंदर मुक्काम असतात. घर नसतं. घर तर शेवटपर्यंत एकमेकांच्या हातात विसावलेली ती दोन थरथरणारी तळहातं असतात. आणि कदाचित... यालाच संसार म्हणतात. यालाच प्रेम म्हणतात. आणि यालाच... आयुष्याचा सुंदर चकवा!

Whats up **साभार**

# उभे राहून पाणी पिणे



उभे राहून पाणी प्यायल्याने किडनी खराब होते, पचन बिघडते किंवा सांधेदुखी होते, असे अनेक दावे केले जातात. मात्र या दाव्यांमागे ठोस वैज्ञानिक पुरावा आहे का? पाणी पिण्याची शरीराची स्थिती, हायड्रेशनचे महत्त्व, अतिप्रमाणात पाणी प्यायल्याचे धोके आणि हृदय-किडनीच्या रुग्णांनी कोणती काळजी घ्यावी, याबाबत जाणून घेऊया. बसून पाणी पिण्याची सवय चांगली असू शकते, पण उभे राहून पाणी प्यायल्याने अवयव खराब होतात असे मानणे योग्य नाही. पाणी पिणे ही आपल्या दिवसातील अगदी साधी गोष्ट आहे; मात्र पाणी बसून प्यावे की उभे राहून, यावरून अनेक वर्षांपासून वेगवेगळे समज-गैरसमज ऐकायला मिळतात. घरातील मोठ्यांकडूनउभे राहून पाणी पिऊ नये, नेहमी बसूनच पाणी प्यावे, असा सल्ला अनेकांना मिळतो. काही जण तर उभे राहून पाणी प्यायल्याने किडनीवर परिणाम होतो, सांधे खराब, सांधेदुखी होते किंवा पोटाच्या समस्या निर्माण होतात असेही सांगतात. त्यामुळे अनेकांच्या मनात हा प्रश्न असतो की, पाणी पिताना शरीराची स्थिती योग्य असणं खरंच इतकं महत्त्वाचं आहे का? सोशल मीडियावर आरोग्याशी संबंधित अनेक दावे वेगाने पसरतात. त्यापैकी काहींच्या मागे वैज्ञानिक आधार असतो, तर काही केवळ पारंपरिक समजुतींवर आधारित असतात. पाणी पिताना शरीराची स्थिती आणि आरोग्य यांच्यात नेमका काय संबंध आहे, उभे राहून पाणी प्यायल्याने खरंच किडनी किंवा पचनसंस्थेला नुकसान होते का, तसेच दिवसभरात किती पाणी प्यावे याकडे लक्ष देणे का महत्त्वाचे आहे, हे समजून घेणे गरजेचे आहे. पचनसंस्था आणि शरीराच्या स्थितीचा संबंध पाणी पोटात पोहोचण्यासाठी पचनसंस्था व्यक्ती बसलेल्या स्थितीवर अजिबात अवलंबून नसते. एकदा का पाणी किंवा द्रवपदार्थ गिळला की तो अन्ननलिकेतून सरळ पोटात जातो आणि त्यानंतर पचनसंस्थेद्वारे शरीरात शोषला जातो. गुरुत्वाकर्षण किंवा उभे राहणे या प्रक्रियेत कोणताही अडथळा आणत नाही. त्यामुळे उभे राहून पाणी प्यायल्याने पचनक्रिया बिघडते हा दावा वैद्यकीयदृष्ट्या चुकीचा आहे. बसून पाणी पिण्याचे व्यावहारिक फायदे आणि घाईघाईत पिण्याचे तोटे शरीराच्या स्थितीचा अवयवांवर दुष्परिणाम होत नसला तरी, बसून आणि सावकाश पाणी पिण्याची सवय काही प्रमाणात फायदेशीर ठरू शकते. शांतपणे बसून पाणी प्यायल्याने व्यक्ती लक्षपूर्वक आणि प्रमाणाचे भान ठेवून पाणी पिते. याउलट, उभे राहून अत्यंत घाईघाईत वेगाने

**क्रमश :**

# अन् पाठीचा त्रास क्षणात जाईल पळून

बॉलीवूड अभिनेत्री मलायका अरोरा ही तिच्या फिटनेससाठी ओळखली जाते. वयाच्या ५२ व्या वर्षीही तिची असणारी शरीरयष्टी आणि तंदुरूस्त शरीरामुळे मलायका ही अनेकांनी प्रेरणादायी आहे. व्यायामाची आवड व समर्पण यामुळे तिचे चाहत्यांकडून कौतुक केले जाते. आता मलायकाने कंबरेचा त्रास होणाऱ्या महिलांसाठी खास व्यायाम सांगितला आहे. सोशल मीडियावर सक्रिय असलेली मलायका अरोरा चाहत्यांबरोबर तिची व्यायामाची पद्धत सांगत असते. तसेच योगासने आणि व्यायामासंबंधित व्हिडीओही पोस्ट करत असते. नुकताच तिने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला असून, यामध्ये कंबर व नितंब यांसाठी चार योगप्रकार सांगितले आहेत. मलायका अरोराने कंबर आणि नितंब (पाठीच्या खालचा भाग) यासाठी उपयुक्त असणारी चार योगासने सांगितली आहेत. जास्त वेळ एकाच जागी बसून काम करणाऱ्या किंवा सकाळी उठल्यानंतर शरीरात जडपणा जाणवणाऱ्या लोकांसाठी हे स्ट्रेच फायदेशीर ठरू शकतात. मलायकाने हे व्यायामप्रकार करून दाखवले आहेत. पहिल्या योगा प्रकारासाठी योगामॅटवर पालथे झोपून पोटावर दाब देऊन, हळूहळू हात व पाय एकाच वेळी जमिनीपासून वर करावे. या व्यायाम प्रकारास काहीजण 'सुपरमॅन' व्यायामसुद्धा म्हणतात. दुसऱ्या व्यायाम प्रकारामध्ये, एक



पाय पुढे ठेवा आणि दुसरा पाय मॅटवर ठेवा. आधारासाठी एक हात जमिनीवर ठेवा आणि दुसरा हात वरच्या बाजूने वर उचला. हळूहळू छाती वर केलेल्या हाताच्या दिशेने वळवा. तर तिसऱ्या प्रकारामध्ये दोन्ही पाय जमिनीवर ठेवून स्क्वॅट्स सारखे खाली बसा. त्यानंतर हळू-हळू एक हात आणि नंतर दुसरा हात पूर्णपणे आकाशाच्या दिशेने वर करा. यावेळी दुसऱ्या हाताचा विरुद्ध पायाला स्पर्श झालेला पाहिजे. मलायकाने सांगितलेल्या चौथ्या पोझिशनमुळे शरीर स्ट्रेच होणार असून यामुळे कंबरेच्या भागाचा चांगला व्यायाम होत असल्याचे दिसून येत आहे. यासाठी खाली बसून दोन्ही पाय पुढे करून गुडघापासून वर करा. त्यानंतर शरीराला आधार देण्यासाठी दोन्ही हात मागे जमिनीवर टेकलेले पाहिजेत. यावेळी कंबरसुद्धा जमिनीवर टेकलेली असली पाहिजे. यानंतर शरीर सैल ठेवून, गुडघ्यांवर जोर देऊन हालचाल करा. यामुळे कंबरेचा व नितंबाचा चांगला व्यायाम होणार आहे. मलायका अरोराने अशा चार पद्धतीचा व्यायाम सुचवला आहे. मलायकाने हा व्यायाम खास महिलांसाठी सांगितला असून तिने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, तुमच्या दैनंदिन व्यायामासाठी योगासनांचे हे ४ प्रकार सेव्ह करून ठेवा. मलायकाने सांगितलेल्या व्यायामासाठी कोणत्याही विशेष साधनांची गरज नसून तुम्ही घरच्या घरीही हे अगदी सहज करू शकता. यामुळे आखडलेली कंबर किंवा पाठ सैल होऊ शकते. दिवसभर एकाच जागी बसून काम करणाऱ्या लोकांसाठीसुद्धा मलायका अरोराने सांगितलेला व्यायाम फायदेशीर ठरू शकतो. मात्र, कोणताही अतिरिक्त व्यायाम किंवा योगप्रकार तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करणे अधिक योग्य आणि सुरक्षित ठरेल.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

### मराठवाड्यासाठी दोन दिवस

प्रश्नावर निर्णयाला विलंब का, असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. १७ सप्टेंबर हा हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन. निजामशाहीच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी मराठवाड्यातील जनतेने मोठा संघर्ष केला. मात्र, स्वातंत्र्यानंतरही मराठवाड्याच्या वाट्याला कायमस्वरूपी दुष्काळ, पाणीटंचाई, सिंचनाचा अनुशेष आणि विकासातील असमतोल आल्याची खंत डॉ. लाखेपाटील यांनी व्यक्त केली. मराठवाडा निजामशाहीतून लढून मुक्त झाला; मात्र आता तो नैसर्गिक दुष्टचक्रात सापडला आहे. येणाऱ्या भयावह दुष्काळाची दाहकता कमी करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. दुष्काळ जाहीर करण्याबरोबरच सिंचन प्रकल्प, पाणी साठवण, जलसंधारण, अपूर्ण प्रकल्पांची पूर्तता, प्रलंबित पाणी योजना आणि मराठवाड्याच्या विकासातील अनुशेष दूर करण्यासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. मराठवाड्यातील दुष्काळाचे चक्र कायमचे थांबविण्यासाठी दीर्घकालीन आणि समग्र धोरणाची आवश्यकता असून त्यासाठी शासनाने ठोस नियोजन करावे, अशी मागणी डॉ. लाखेपाटील यांनी केली आहे.

### जालन्यात अवैध मद्यनिर्मिती,

मद्यनिर्मिती व विक्रीची ठिकाणे शोधून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, तसेच मद्याची अवैध वाहतूक करणारे आणि अवैधरित्या मद्य बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### पत्रकारांच्या समस्या नियमा

आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे सांगितले. शासकीय कार्यक्रमांसाठी माध्यम प्रतिनिधींना आवश्यक समन्वय साधण्यात येईल. जाहिरातींचे वितरण शासनाच्या नियमावलीनुसार करण्यात येते. स्थानिक माध्यमांना नियमांच्या चौकटीत आवश्यक सहकार्य मिळण्यासाठीही समन्वय साधला जाईल, असेही त्यांनी सांगितले. माहिती कार्यालय आणि पत्रकार यांच्यातील संवाद अधिक सुसूत्र करण्यासाठी माहिती वितरणाची प्रभावी व्यवस्था निर्माण करण्यात येईल. पत्रकारांच्या प्रश्नांवर नियमितपणे चर्चा व्हावी, यासाठी भविष्यात अशा समन्वय बैठका घेण्यात येतील, असेही श्री. टाके यांनी सांगितले. प्रारंभी पत्रकारांच्या वतीने सुयोग खेर्डेकर यांनी उपसंचालक प्रविण टाके यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

### कुणबी प्रमाणपत्र देण्याची

कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच ग्राम व तालुका पातळीवरील यंत्रणांनी अर्जदारांना आवश्यक नोंदी उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये संबंधित प्रकरणांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. उपलब्ध नोंदींचा प्रभावी वापर करून पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले. बैठकीत विभागातील जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील प्रमाणपत्र प्रक्रियेची सद्यस्थिती आणि करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

### वायाळ पांगरी येथील

अध्यक्षस्थानी मा. मुख्याध्यापक के. जी. राठोड होते. तसेच केंद्रप्रमुख ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोरे सर यांनी केले. अशोक वायाळ यांची अध्यक्षपदी सर्वानुमते निवड शालेय व्यवस्थापन समितीच्या नवीन कार्यकारिणीची निवड सर्वानुमते करण्यात आली. यामध्ये नूतन अध्यक्षपदी श्री. अशोक रामनाथ वायाळ यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे उपस्थित पालक, शिक्षक व नागरिकांनी स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी श्री.़तसेच राऊतवाड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली समितीची निवड प्रक्रिया पार पडली. शालेय व्यवस्थापन समिती ही शाळा आणि समाज यांच्यातील महत्त्वाचा दुवा असून, विद्यार्थ्यांच्या हितासाठी आवश्यक निर्णय घेण्यास तसेच शाळेच्या विकासकामांना गती देण्यास समितीची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे नूतन समितीच्या माध्यमातून शाळेच्या विविध समस्या सोडवून विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शाळेचा सर्वांगीण विकास करण्याची ग्वाही

नूतन अध्यक्ष श्री. अशोक रामनाथ वायाळ यांनी आपल्या मनोगतात शाळेच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. येणाऱ्या काळात शाळेचा सर्वांगीण विकास करण्यासोबतच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांना प्रोत्साहन देण्यात येईल. शाळेतील उपलब्ध साधनसुविधांचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असेही श्री. वायाळ यांनी सांगितले.

पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग शालेय व्यवस्थापन समितीच्या स्थापनेच्या कार्यक्रमाला पालक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शाळेचा दर्जा उंचावणे आवश्यक असून, त्यासाठी शाळेला सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका उपस्थित पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केली. शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा, क्रीडा साहित्याची उपलब्धता, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्यावर यावेळी भर देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. अमोल वायाळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. नूतन अध्यक्ष श्री. अशोक रामनाथ वायाळ यांच्या नेतृत्वाखाली शालेय व्यवस्थापन समिती शाळेच्या विकासासाठी प्रभावीपणे कार्य करेल आणि वायाळ पांगरी येथील विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील, असा विश्वास उपस्थित पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केला.

### गणेशोत्सवासाठी बदनापूर

घेण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. दरम्यान, शासनाच्या निर्देशानुसार व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्लास्टर ऑफ पॅरिस (झेझ) मूर्ती विसर्जनाबाबतच्या मानक कार्यपद्धतीनुसार (SOP) आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश शहर समन्वयक ओंकार सहाणे यांना देण्यात आले आहेत.

गणेश उत्सवाच्या काळात सोपविण्यात आलेली कामे वेळेत पूर्ण करून कोणत्याही प्रकारची दुर्घटना अथवा गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. आदेशाचे पालन न झाल्यास महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक शहर अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आदेशात देण्यात आला आहे.

### लखन तुरे हत्या

तसेच बीड जिल्ह्यातील गेवराईसह जालना जिल्ह्यातील अंबड अशा विविध ठिकाणी आरोपींचा शोध घेतला. आरोपी वारंवार ठिकाणे बदलत असल्यामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. दरम्यान, दि. ७ सप्टेंबरच्या मध्यरात्री पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांना आरोपी राजूर रोडवरील घानेवाडी शिवारातील एका शेतात लपल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने परिसरात सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला; मात्र पथकाने पाठलाग करून शुभम जोगदंड आणि किशोर या दोघांना ताब्यात घेतले. पोलिसांच्या चौकशीत या दोघांनी गुन्ह्याबाबत माहिती दिल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणातील अन्य दोन आरोपींना यापूर्वीच चंदनझिरा पोलिसांनी अटक केली होती. त्यामुळे आता या गुन्ह्यातील चारही आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत. आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पैशांच्या देवाणघेवाणीच्या वादातून हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक किरण बिडवे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेजवीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे आणि चंदनझिरा पोलिसांच्या पथकाने केली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# परतूरमध्ये लिओ क्लबतर्फे गणपती मूर्ती निर्मिती कार्यशाळा उत्साहात संपन्न

परतूर : लिओ क्लब ऑफ परतूरच्या वतीने पर्यावरणपूरक गणपती मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. क्लबचे अध्यक्ष जयेश होलानी यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव आशिष सकलेचा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेत १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच स्वतःच्या हाताने पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व कल्पकतेने सुंदर गणेशमूर्ती तयार केल्या. उत्कृष्ट कलाकृती साकारलेल्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक



करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इव्हेंट चेअरपर्सन साक्षी दरगड व दिशा होलानी यांनी विशेष योगदान दिले. तसेच नैतिक नहार, रोहित दरगड, हर्षिता होलानी, संयुक्ति सकलेचा, कृष्णा दरगड, शगुन होलानी, गौरव राठी, देवांश होलानी, गणेश थोटे धनश्री होलानी आदित्य सोमाणी दत्ता खुले यांच्यासह लिओ क्लबच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमाच्या नियोजन व आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. बक्षीस वितरणासाठी लायन्स क्लबचे अध्यक्ष महेश होलांनी, लिओ समन्वयक संदीप चव्हाण डॉक्टर भानुदास कदम शिल्पा होलांनी, मुकुंद शेपाळ ,नरपत जांगिड गुणवंत पिंपळे दिलीप नहार व पालक उपस्थित होते. साईबाबा कॉर्नर वरील अक्षय कॉटेक्स येथे संपन्न झालेल्या या उपक्रमाला सर्व शाळेच्या विद्यार्थी, शिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा लिओ क्लब ऑफ परतूरचा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

## सरपंच परिषदेच्या पाठपुराव्याला यश

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी सरपंच परिषदेचे महाराष्ट्र-मुंबई अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन पाठपुरावा केला होता. निवडणुका प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत राहण्यासाठी प्रशासक नियुक्त करण्याची मागणी त्यांनी मंत्री गोरे यांच्याकडे केली होती. या पाठपुराव्यानंतर शासनाने सकारात्मक निर्णय घेत अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे मुदत संपलेल्या आणि निवडणुका प्रलंबित असलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# परतूरमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चा दहीहंडी महोत्सव उत्साहात संपन्न

परतूर : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला दहीहंडी महोत्सव २०२६ रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी परतूर शहरातील मार्केट कमिटी मैदानावर मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. महेश भैय्या नळगे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस नितीन जेथलिया परतुर नपचे गटनेते गणेशनाना नळगे बाबुराव हिवाळे होते यावेळी दहीहंडी फोडण्यासाठी विविध गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. ढोल-ताशांचा गजर,



गोविंदांचा उत्साह आणि उपस्थित नागरिकांच्या जल्लोषामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते प्रथम पारितोषिक तब्बल ५० हजार ९९९ रुपये. दमदार कामगिरी करणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकाला हे पारितोषिक प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास नगरसेवक राजेश खंडेलवाल, शाकेर खतिब, विसम सय्यद, दिपक कदम दिपक काळे, दत्ता पाटील सुरुंग ,राहुल कदम , मधुकर पाईकराव, विजय वाणी, अशोक तनपुरे शाम बरकुले संदिप जगताप बबलुशेठ बंदुकवाले , नामदेव धुमाळ ,भाऊसाहेब मुके ,शुभम पडुळ प्रताप देशमुख, शाम शिंदे, गजानन मस्के, संदिप पाचारे रवि देशमुख , ज्ञानेश्वर केवारे, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तसेच परतूर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवर व नागरिकांचे स्वागत करण्यात आले. शिवसेनेच्या वतीने आयोजित या दहीहंडी महोत्सवामुळे परतूर शहरात उत्साह, एकजूट आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# आरक्षण देणाऱ्यांवरच आक्षेपार्ह शब्दप्रयोग नको, मंत्री उदय सामंतांचे जरांगे पाटलांना आवाहन

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारची प्रशासकीय आणि राजकीय यंत्रणा पुन्हा एकदा सक्रीय झाली आहे. मंगळवारी छत्रपती संभाजीनगर येथे दाखल झालेले उद्योगमंत्री उदय सामंत आणि भाजप आमदार प्रसाद लाड यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. बैठकीपूर्वी प्रसारमाध्यमांशी बोलताना मंत्री सामंत यांनी, जरांगे पाटलांच्या १३ पैकी १२ मागण्या पूर्ण झाल्या असून त्यांनी उपोषण मागे घ्यावे, त्यांनी हाक दिल्यास आम्ही चर्चेला ओ देऊ, असे स्पष्ट आवाहन केले. २०१४ पासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन मराठा आरक्षणासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आणि आरक्षण दिले. आरक्षण देणाऱ्या नेत्यांवर किंवा मुख्यमंत्र्यांबद्दल आक्षेपार्ह शब्दप्रयोग करणे योग्य नाही. कोणाबद्दलही वाईट वक्तव्य करू नये, अशी आमची विनंती आहे. जरांगे पाटलांनी केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी तपासण्यासाठी आणि अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, यासाठी आम्ही इथे आलो आहोत, असं उदय सामंत म्हणाले. हैदराबाद अन् सातारा गॅझेटवर कायदेशीर प्रक्रिया सुरू शासनाने घेतलेल्या निर्णयांची माहिती देताना सामंत यांनी स्पष्ट केले की, हैदराबाद गॅझेटची एसओपी तयार करण्यात आली आहे, तर सातारा आणि कोल्हापूर गॅझेटबाबत ॲडव्होकेट जनरल यांचे कायदेशीर मत घेतले जात आहे. एसईबीसी प्रवर्गातून ३ लाख ५० हजार दाखले वितरीत करण्यात आले असून हे आरक्षण न्यायालयात टिकावे, हीच सरकारची भावना आहे. रद्द झालेल्या ४ प्रमाणपत्रांबाबत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट आदेश दिले असून ती न्यायालयीन बाब आहे. आ. प्रसाद लाड यांचे जरांगे यांना 'हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे, आम्ही चर्चेसाठी तयार आमदार प्रसाद लाड यांनी सांगितले की, काल रात्री जरांगे पाटलांशी फोनवरून संवाद साधला असून खालावलेली प्रकृती लक्षात घेता त्यांनी रुग्णालयात उपचार घ्यावेत, अशी विनंती केली आहे. पोळा, गणेशोत्सव, नवरात्र आणि दिवाळी या सणासुदीच्या काळात समाजात सुसंवाद राहावा, हीच आमची भूमिका आहे. आज जिल्हाधिकारी स्तरावर आणि उद्या सकाळी साडेनऊ वाजता सामाजिक न्याय विभागाच्या जात प्रमाणपत्रांसंदर्भात विभागीय आयुक्तांसोबत विशेष आढावा बैठक होणार आहे.

पान ४ वरून

## शास्त्रीय नृत्य, लोककला,

जानेवारी महिन्यात घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**विभागनिहाय उत्कृष्ट संघ**

संगीत विभागात स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा; नृत्य विभागात अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना; नाट्य विभागात मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन; वाङ्मय विभागात लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर व अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना संयुक्तरीत्या; तर ललित कला विभागात डॉ. सुभाषराव ढाकणे संगणकशास्त्र महाविद्यालय, जालना यांनी उत्कृष्ट संघाचा मान पटकावला. शोभायात्रेत स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा प्रथम, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना द्वितीय आणि मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन तृतीय ठरले.

**विविध स्पर्धांमध्ये विजेत्यांची चमक**

भारतीय शास्त्रीय गायनात स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा; भारतीय शास्त्रीय तालवाद्यात जे.ई.एस. महाविद्यालय, जालना; भारतीय सुगम गायन आणि समूह गायनात जे.ई.एस. महाविद्यालय; पाश्चात्य सुगम गायनात स्वामी विवेकानंद महाविद्यालय तर पाश्चात्य वाद्य वादनात एम.एस.एस. महाविद्यालय, अंबड यांनी प्रथम क्रमांक पटकावला. नाट्य विभागातील एकांकिका स्पर्धेत अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या 'गावाचा पंचनामा'ने प्रथम, तर बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या 'आकडा'ने द्वितीय क्रमांक मिळविला. उत्कृष्ट पुरुष अभिनयात बलराज अंभोरे, उत्कृष्ट स्त्री अभिनयात किरण काळे, उत्कृष्ट दिग्दर्शनात सृष्टी पवार आणि उत्कृष्ट विद्यार्थी संहिता लेखनात आशिष खंडागळे प्रथम ठरले. प्रहसनात संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी; मिमिक्री आणि मूकाभिनयात मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन यांनी प्रथम पारितोषिक पटकावले. वादविवादात बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, प्रश्नमंजुषेत ओमशांती अध्यापक महाविद्यालय, अंबड यांनी प्रथम स्थान मिळविले. ललित कला विभागात लघुपट स्पर्धेत श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, रांगोळीत राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, चित्रकलेत डॉ. सुभाषराव ढाकणे संगणकशास्त्र महाविद्यालय, कोलाजमध्ये कला-वाणिज्य-विज्ञान महाविद्यालय अंकुशनगर, पोस्टरमध्ये मोरेश्वर महाविद्यालय, मृदुमूर्तीकलेत एम.एस.एस. कला महाविद्यालय तीर्थपुरी, व्यंगचित्रकलेत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, स्पॉट फोटोग्राफीत स्व. ॲड. एस. डी. देशमुख महाविद्यालय भोकरदन आणि इन्स्टॉलेशनमध्ये राजर्षी शाहू महाराज महाविद्यालय, पारध यांनी प्रथम क्रमांक मिळविला. डॉ. शशिकांत पाटील यांनी निकाल वाचन केले. डॉ. सुभाष वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. पांडुरंग नवल यांनी आभार मानले. दोन दिवसांच्या या महोत्सवात कला, संस्कृती, सामाजिक भान, विचारांची धार आणि तरुणाईचा उत्साह यांचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला. स्पर्धेतील विजय-पराजयापलीकडे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेले व्यासपीठ आणि नव्या पिढीला भारतीय संस्कृतीशी जोडणारा अनुभव हेच या महोत्सवाचे मोठे यश ठरले.

## ✻युवक महोत्सवाचा निकाल✻

✻कला गट, कला प्रकारनिहाय विजेतेसंघ पुढील प्रमाणे:✻

✻कलाप्रकार निहाय उत्कृष्ट संघ✻

✻**संगीत विभाग उत्कृष्ट संघ**: स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि. जालना✻

✻**नृत्य विभाग उत्कृष्ट संघ** : अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना✻

✻**नाट्य विभाग उत्कृष्ट संघ** : मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना✻

पान ४ वरून

✻**वाङ्मय विभाग उत्कृष्ट संघ:** लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय व अंकुशराव टोपे महाविद्यालय✻

✻**ललित विभाग उत्कृष्ट संघ** :डॉ. सुभाषराव ढाकणे संगणकशास्त्र महाविद्यालय, जालना✻

✻**शोभायात्रा**✻

। **प्रथम पारितोषिक** । ४७ । स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ११ -बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ४१ । मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

✻। विविध विभाग । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव✻

**संगीत विभाग**

१. कला-प्रकार : भारतीय शास्त्रीय गायन (वैयक्तिक)

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ४७ । स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । २१ । लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । १४ । संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।

**२. कला-प्रकार** : भारतीय शास्त्रीय तालवाद्य (वैयक्तिक)

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

।---।---।---।

। **प्रथम पारितोषिक** । ३५ । जे. ई. एस. महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । १४ । संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६४ । एम.एस.एस. कला महाविद्यालय, तीर्थपुरी, जि. जालना ।

**३. कला-प्रकार** : भारतीय सुगम गायन (वैयक्तिक)

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ३५ । जे. ई. एस. महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ४७ । स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । १४ । संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।

**४. कला-प्रकार : भारतीय समूह गायन (सांघिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ३५ । जे. ई. एस. महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ४७ । स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना ।

**५. कला-प्रकार : पाश्चात्य सुगम गायन (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ४७ । स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । १४ । संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।

**६. कला-प्रकार : पाश्चात्य वाद्य वादन (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । २९ । एम.एस.एस. महाविद्यालय, अंबड, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ५८ । सिध्दार्थ महाविद्यालय, जाफ्राबाद, जि. जालना ।

पान ४ वरून

। **तृतीय पारितोषिक** । १४ । संत रामदास **महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।**

**नृत्य विभाग**

१. कला-प्रकार : लोक आदिवासी नृत्य (सांघिक)

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ४१ । मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

**२. कला-प्रकार : भारतीय शास्त्रीय नृत्य (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

।---।---।---।

। **प्रथम पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । १८ । डॉ. सुभाषराव ढाकणे विधी महाविद्यालय, जालना ।

। तृतीय पारितोषिक---

**नाट्य विभाग**

१. कला-प्रकार : एकांकिका (मराठी / हिंदी) (सांघिक)

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । - । - ।

**२. कला-प्रकार : उत्कृष्ट अभिनय (पुरुष)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव । कलावंताचे नाव । पात्राचे नाव । एकांकिकेचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना । बलराज अंभोरे । तात्या । आकडा ।

। **द्वितीय पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना । रोहीत स्वामी । पंढरी । आकडा ।

। **तृतीय पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना । आशिष खंडागळे । सरपंच । गावाचा पंचनामा ।

**३. कला-प्रकार : उत्कृष्ट अभिनय (स्त्री)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव । कलावंताचे नाव । पात्राचे नाव । एकांकिकेचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना । किरण काळे । गंगु । गावाचा पंचनामा ।

। **द्वितीय पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना । गिरीजा टाकळकर । सावित्री । आकडा ।

। **तृतीय पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना । पायल पांगारकर । शांती । गावाचा पंचनामा ।

**४. कला-प्रकार : उत्कृष्ट दिग्दर्शन**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव । दिग्दर्शकाचे नाव । एकांकिकेचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना । सृष्टी पवार । गावाचा पंचनामा ।

। **द्वितीय पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना । पल्लवी धनगर । आकडा ।

। **तृतीय पारितोषिक** । - । - । - । - ।

**५. एकांकिका : उत्कृष्ट संहिता लेखन (विद्यार्थी)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव । लेखकाचे नाव । एकांकिकेचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना । आशिष खंडागळे । गावाचा

पान ४ वरून

पंचनामा ।

। **द्वितीय पारितोषिक** ---

। **तृतीय पारितोषिक** ----

**६. कला-प्रकार : प्रहसन (सांघिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

**प्रथम पारितोषिक** । १४ । संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ४१ । मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना ।

**७. कला-प्रकार : नकला (मिमिक्री) (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ४१ । मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । १४ । संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ४५ । मॉडेल कॉलेज, घनसावंगी, जि. जालना ।

**८. कला-प्रकार : मूकाभिनय (सांघिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ४१ । मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६५ । डॉ. सुभाषराव ढाकणे संगणकशास्त्र महाविद्यालय, जालना ।

**वाङ्मय विभाग**

१. कला-प्रकार : वक्तृत्व (वैयक्तिक)

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । २१ । लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६३ । एम.एस.एस. विधी महाविद्यालय, जालना ।

**२. कला-प्रकार : वादविवाद (सांघिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । २१ । लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६९ । डॉ. शिवाजी मदन व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय, जालना ।

**३. कला-प्रकार : प्रश्नमंजुषा (सांघिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ३४ । ओमशांती अध्यापक महाविद्यालय, अंबड, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । २९ । एम.एस.एस. महाविद्यालय, अंबड, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना ।

ललित कला विभाग

**१. कला-प्रकार : लघुपट**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ४६ । श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । २१ । लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६८ । अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना ।

**२. कला-प्रकार : रांगोळी (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

पान ४ वरून

। **प्रथम पारितोषिक** । ५० । राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ३१ । छत्रपती शिवाजी महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । २३ । जिजाऊ महाविद्यालय, वरुड (बु.), जि. जालना ।

**३. कला-प्रकार : चित्रकला (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ६५ । डॉ. सुभाषराव ढाकणे संगणकशास्त्र महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ३५ । जे. ई. एस. महाविद्यालय, जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । १४ । संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।

**४. कला-प्रकार : कोलाज (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ६२ । कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंकुशनगर, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । १४ । संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । २९ । एम.एस.एस. महाविद्यालय, अंबड, जि. जालना ।

**५. कला-प्रकार : पोस्टर (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ४१ । मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ४७ । स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६५ । डॉ. सुभाषराव ढाकणे संगणकशास्त्र महाविद्यालय, जालना ।

**६. कला-प्रकार : मृदुमूर्तीकला (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ६४ । एम.एस.एस. कला महाविद्यालय, तीर्थपुरी, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ६२ । कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंकुशनगर, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । २१ । लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर, जि. जालना ।

**७. कला-प्रकार : व्यंगचित्रकला (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । ११ । बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ४१ । मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ६५ । डॉ. सुभाषराव ढाकणे संगणकशास्त्र महाविद्यालय, जालना ।

**८. कला-प्रकार : स्पॉट फोटोग्राफी (वैयक्तिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । १६ । स्व. ॲड. एस. डी. देशमुख महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ४४ । शिवराज महाविद्यालय, परतूर, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । ९ । देवकी महाविद्यालय, पीरपिंपळगाव, जि. जालना ।

**९. कला-प्रकार : इन्स्टॉलेशन (सांघिक)**

। श्रेणी । कोड क्रमांक । विजेत्या महाविद्यालयाचे नाव ।

। **प्रथम पारितोषिक** । २८ । राजर्षी शाहू महाराज, पारध, जि. जालना ।

। **द्वितीय पारितोषिक** । ४५ । मॉडेल कॉलेज, घनसावंगी, जि. जालना ।

। **तृतीय पारितोषिक** । २९ । एम.एस.एस. महाविद्यालय, अंबड, जि. जालना ।

# शास्त्रीय नृत्य, लोककला, रांगोळी, वक्तृत्वासह विविध स्पर्धांनी जिंकली मने; ७९ महाविद्यालयांतील ५८१ कलावंतांचा सहभाग

## कलाविष्कार, विचारांची धार आणि तरुणाईच्या ऊर्जेने रंगला जालना जिल्हा युवक महोत्सव * प्र.कुलगुरु डॉ.वक्ते यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके; ऑक्टोबरमध्ये केंद्रीय युवक महोत्सव

प्रतिनिधी, परतूर :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचा परतूर येथील लालबहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालयात मंगळवारी दि. ८ सप्टेंबर रोजी जल्लोषात समारोप झाला. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात संगीत, नृत्य, नाट्य, वाङ्मय आणि ललित कला अशा विविध विभागांतील स्पर्धांमधून तरुणाईच्या प्रतिभेचा अक्षरशः उत्सव अनुभवायला मिळाला. जिल्ह्यातील ७९ महाविद्यालयांतील तब्बल ५८१ कलावंतांनी सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ व ८ सप्टेंबर रोजी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले, तर कुलगुरू डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते.

समारोप सोहळ्यास प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. कवयित्री गुंजन पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. संस्थेचे सचिव तथा माजी अधिसभा सदस्य कपिल आकात अध्यक्षस्थानी होते. यावेळी वर्षा आकात, उपाध्यक्ष डॉ. कुणाल आकात, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. योगिता होके पाटील, प्राचार्य डॉ. भारत खंदारे, जिल्हा समन्वयक प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, अधिसभा सदस्य प्रा. नाना गोडबोले, डॉ. भगवानसिंग डोभाळ, डॉ. दिलीप अर्जुने, डॉ. दिलीप महालिंगे, डॉ. किशोर शिरसाठ, डॉ. समाधान इंगळे, डॉ. शशिकांत पाटील यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, सांस्कृतिक विभागप्रमुख, विद्यार्थी व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शास्त्रीय नृत्याने सभागृह मंत्रमुग्ध**

महोत्सवात सादर झालेल्या भारतीय शास्त्रीय नृत्याने उपस्थित प्रेक्षक आणि परीक्षकांची विशेष मने जिंकली. लयबद्ध हालचाली, अचूक ताल, नेत्रसुखद भावमुद्रा, पारंपरिक वेशभूषा आणि पदलालित्य यांच्या अप्रतिम संगमाने सादरीकरणाला वेगळी उंची मिळाली. शास्त्रीय संगीताच्या तालावर कलाकारांनी सादर केलेल्या नृत्याला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. भारतीय शास्त्रीय नृत्य प्रकारात अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना यांनी प्रथम, तर डॉ. सुभाषराव ढाकणे विधी महाविद्यालय, जालना यांनी द्वितीय पारितोषिक पटकावले. नृत्य विभागातील उत्कृष्ट संघाचा मानही अंकुशराव टोपे महाविद्यालयाने मिळविला.

**आदिवासी नृत्य ते पांडुरंगाच्या जयघोषापर्यंत सृजनरंग मंच गाजला**

आदिवासी नृत्य, कोळी गीत, बंजारा गीत, देवीचा जागरण–गोंधळ, पंढरीच्या पांडुरंगाचा जयघोष आणि ज्ञानोबा–तुकारामाच्या भक्तिरसाने सृजनरंग कलामंच अक्षरशः दुमदुमून गेला. एकापेक्षा एक सरस कलाविष्कारांवर प्रेक्षकांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करत कलाकारांना भरभरून प्रतिसाद दिला. लोक व आदिवासी नृत्य प्रकारात बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना प्रथम, अंकुशराव टोपे महाविद्यालय द्वितीय तर मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन तृतीय ठरले.

**रांगोळीतून महाराष्ट्राची संस्कृती, पर्यावरण आणि विकसित भारताचे दर्शन**

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी मराठा क्रांती भवनातील स्टेज क्रमांक ४ वर घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेत ६३ स्पर्धकांनी सहभाग घेतला. 'महाराष्ट्राची संस्कृती', 'वसुंधरा संवर्धन' आणि 'भविष्यातील भारत २०४७' या विषयांवर स्पर्धकांनी कल्पक कलाकृती साकारल्या. 'पाणी वाचवा', 'पर्यावरणाचे संरक्षण करा', 'सायकलचा वापर करा', 'आत्मनिर्भर भारत–सक्षम भारत', 'सोल्युशन नॉट पोल्युशन', 'पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा' आणि '२०४७ मधील भारत' अशा विविध सामाजिक आशयांच्या रांगोळ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. रांगोळी स्पर्धेत राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना प्रथम, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, भोकरदन द्वितीय आणि जिजाऊ महाविद्यालय, वरुड (बु.) तृतीय ठरले.

**'मोबाईलच्या हातातले आम्ही'ने युवकांना केले अंतर्मुख**

वक्तृत्व स्पर्धेने महोत्सवाला वैचारिक उंची दिली. तब्बल ६९ स्पर्धकांनी सहभाग घेत सामाजिक आणि समकालीन विषयांवर धारदार मते मांडली. स्पर्धकांनी आपली ओळख न सांगता कोड क्रमांकाच्या माध्यमातून भाषणे सादर केली.

**'मोबाईलच्या हातातले आम्ही...'** या विषयावर आधुनिक काळातील डिजिटल व्यसन, सोशल मीडियाचे वाढते आकर्षण, कुटुंबातील घटता प्रत्यक्ष संवाद, विद्यार्थ्यांचे विचलित होणारे लक्ष आणि 'लाईक्स–फॉलोअर्स'च्या दुनियेत निर्माण होणारा मानसिक ताण यावर तरुण वक्त्यांनी परखड भाष्य केले.

मोबाईल आपल्या हातात आहे, पण आपल्या वेळेचे, भावनांचे आणि विचारांचे नियंत्रण मोबाईलच्या हातात जात नाही ना? असा अंतर्मुख करणारा सवाल अनेक स्पर्धकांनी उपस्थित केला. मोबाईल हे ज्ञान, शिक्षण, रोजगार आणि संवादाचे महत्त्वाचे साधन असले तरी त्याचा विवेकपूर्ण आणि मर्यादित वापर आवश्यक असल्याचा सूर वक्तृत्वातून उमटला.

'मी अहिंसा बोलतेय...' या विषयातून शांतता आणि अहिंसेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले, तर '...तरी फुलांचे गाणे गातो मराठवाडा' या विषयातून दुष्काळ, संकटे आणि प्रतिकूल परिस्थितीशी लढत आशावादी राहणाऱ्या मराठवाड्याची गौरवगाथा मांडण्यात आली.

वक्तृत्व स्पर्धेत अंकुशराव टोपे महाविद्यालय प्रथम, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर द्वितीय आणि एम.एस.एस. विधी महाविद्यालय, जालना तृतीय ठरले. परीक्षक म्हणून महेश अचिंतलवार, डॉ. मकरंद गिरी व धम्मपाल जाधव यांनी काम पाहिले. प्रा. सखाराम टकले, प्रा. विशाल सरवदे, प्रा. शैलेंद्र शेलार, प्रा. कुलदीप चव्हाण आणि प्रा. शरद बोराडे यांनी संयोजन केले. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी जिल्ह्यातील ७९ महाविद्यालयांचे ५८१ कलावंत महोत्सवात सहभागी झाल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील युवा कलावंतांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात महोत्सव यशस्वी ठरल्याचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांनी नमूद केले.

**केंद्रीय युवक महोत्सव ५ ते ७ ऑक्टोबरदरम्यान**

जिल्हास्तरीय महोत्सवातील प्रत्येक कला प्रकारातील प्रथम तीन पारितोषिक विजेत्यांना केंद्रीय युवक महोत्सवात सहभागी होता येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात ५ ते ७ ऑक्टोबरदरम्यान केंद्रीय युवक महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. कैलास अंभुरे यांनी दिली. लोककला महोत्सव (पान ३ वर)











### आवडत्या क्षेत्रातच करिअर घडवा : गुंजन पाटील

**कवयित्री गुंजन पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना युवक महोत्सवातील अनुभव व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. आपल्या आवडीच्या कलेलाच करिअरमध्ये रूपांतरित करा. स्वप्न, सातत्य, मेहनत आणि शिस्त ही यशाची चतु:सूत्री आहे. मोठी स्वप्ने पाहा, अपयशाला घाबरू नका आणि दुसऱ्यांसारखे होण्यापेक्षा स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करा, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी 'अजून वेळ लागेल', 'मुलींना सारं काही कळतं', 'प्रेमात फार भ्रष्टाचार आहे' आणि 'मी बोललंच पाहिजे' या विषयांवरील कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.**

### ३२ वर्षांनंतरचा महोत्सव संस्मरणीय : कपिल आकात

संस्थेचे सचिव कपिल आकात यांनी अध्यक्षीय समारोपात सांगितले की, परतूरच्या ऐतिहासिक भूमीत संस्थेने १९९४ मध्ये केंद्रीय युवक महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले होते. तब्बल ३२ वर्षांनंतर झालेला हा जिल्हा युवक महोत्सव सर्वांच्या सहकार्यामुळे संस्मरणीय ठरला. विद्यापीठ प्रशासन, विविध महाविद्यालये, कलावंत, संयोजक आणि वृत्तपत्रांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

### 'महोत्सव संपला; जीवनप्रवासाची ही सुरुवात' : डॉ. प्रवीण वक्ते


**समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते म्हणाले की, युवक महोत्सवाचा समारोप हा कलेच्या प्रवासाचा शेवट नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे. यातील काही विद्यार्थी पुढे विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचतील. विद्यार्थ्यांची ओळख केवळ महाविद्यालय, पदवी किंवा गुणांनी न होता त्यांच्या कौशल्याने, कर्तृत्वाने आणि व्यक्तिमत्त्वाने झाली पाहिजे. युवकांकडे वेळ, ऊर्जा, स्वप्ने आणि संधी आहेत. त्या ओळखून सातत्याने मेहनत करण्याची गरज आहे. जिंकणाऱ्यांनी नम्र राहावे आणि ज्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी थांबू नये, असा संदेशही त्यांनी दिला.**

### *युवक महोत्सवाचा निकाल*

परतूर, दि.७ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सवातील विजेत्यांना प्रकुलगुरू डॉ.प्रविण वक्ते यांच्या हस्ते विजेत्या संघाना पारितोषिक वितरण करण्यात आले.मान्यवरांच्या उपस्थितीत लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात जल्लोषात मंगळवारी (दि.आठ) समारोप करण्यात आला.

मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर व स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व ८ सप्टेंबर रोजी करण्यात आले. डॉ.शशिकांत पाटील यांनी निकाल वाचन केले. (पान ३ वर)








## जालन्यात 'जालन्याचा राजा'चे ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात आगमन

गणरायाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर मामा चौक परिसरात मोठ्या संख्येने गणेशभक्त उपस्थित होते. ढोल–ताशांच्या तालावर तरुणाईने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. 'गणपती बाप्पा मोरया', 'मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. गणेशमूर्तीच्या आगमनासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष तयारी केली होती. आकर्षक सजावट, भगवे ध्वज आणि फुलांच्या आरासीतून गणरायाचे स्वागत करण्यात आले. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात गणरायाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गणेशभक्तांनी गणरायाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली होती. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मिरवणुकीदरम्यान शिस्त व सुरक्षिततेची काळजी घेतली. गणरायाच्या आगमनामुळे जालना शहरातील गणेशोत्सवाच्या उत्साहाला सुरुवात झाली असून आगामी दिवसांत विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे मंडळाच्या वतीने सांगण्यात आले.

## आरोग्य व्यवस्थेचा कायापालट होणार

मुंबई : सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील प्राथमिक आरोग्यसेवेपासून विशेषोपचारांपर्यंतची साखळी अधिक सक्षम होणार आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे स्वरूप प्रतिबंधात्मक, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत 'प्रगती' आरोग्य सुधारणा प्रकल्प राबविण्यास मंगळवारी मंत्रिमंडळाने मान्यता दिली. तब्बल ४ हजार २५० कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी आशियाई विकास बँकेकडून २ हजार ९७५ कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात येणार असून, राज्याचा १ हजार २७५ कोटी रुपयांचा हिस्सा टप्प्याटप्प्याने उपलब्ध केला जाणार आहे. या प्रकल्पातून फक्त पायाभूत सुविधा उभारण्याऐवजी आरोग्यसेवेची संपूर्ण यंत्रणाच अधिक परिणामकारक करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय स्तरावरील आरोग्य सेवा एकात्मिक पद्धतीने जोडून प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, वेळेवर आणि अचूक निदान, मानक उपचार, रुग्णांना आवश्यक त्या ठिकाणी तातडीने संदर्भित करण्याची व्यवस्था आणि उपचारांचे सातत्य यावर भर दिला जाणार आहे. त्याचबरोबर डिजिटल प्रशासन आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आरोग्य व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. 'प्रगती' प्रकल्पांतर्गत कोल्हापूर आणि नांदेड येथे प्रत्येकी ५०० खाटांची जिल्हा रुग्णालये, तर नागपूर आणि लातूर येथे प्रत्येकी ३०० खाटांची जिल्हा रुग्णालये उभारण्याचे प्रस्तावित आहे. पुणे जिल्ह्यासाठी २०० खाटांचे विशेषोपचार संदर्भ सेवा रुग्णालय सुरू केले जाणार आहे. या पाच रुग्णालयांसाठी एकूण २ हजार ४३० पदे निर्माण करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. या पदांच्या वेतनासाठी दरवर्षी १४७ कोटी ७ लाख रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. आरोग्यसेवेच्या उपलब्धतेबरोबरच तिचा खर्च नागरिकांच्या आवाक्यात राहावा, यावरही या प्रकल्पातून भर दिला जाणार आहे.





शेवटचा श्रावण सोमवारामुळे महादेव मंदिरात भक्तगण महादेवाला बेल फुले वाहताना महिला भगिनी दिसत आहे. छाया किरण खानापुरे

## युजीसी नेट परीक्षा काळात प्रतिबंधात्मक आदेश लागू

जालना : जुन २०२६ परीक्षा दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यातील इंस्टीट्युट ऑफ फार्मसी पाथ्रीकर कॅम्पस बदनापुर या परीक्षा उपकेंद्रावर घेण्यात येणार आहे. वरील परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात अशांतता निर्माण होऊन परीक्षा कालावधीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असलयाने उपरोक्त नमुद परीक्षा उपकेंद्राच्या २०० मीटर परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही म्हणुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागु करण्यात येत आहे. अपर जिल्हादंडाधिकारी जालना याद्वारे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकान्वये खपींर्ळींींश `ष झहरीरलू झरींहीळज्ञरी उराींीं, इरवपरींीं या परीक्षा उपकेंद्राचे २०० मीटर परिसरात परीक्षेचे दिवशी आदेशात नमुद कालावधीकरीता सर्व सार्वजनिक टेलिफोन/ एसटीडी बुथ फॅक्स/ झेरॉक्स केंद्र व ध्वनीक्षेपके बंद ठेवणेकरीता याद्वारे प्रतिबंधात्मक आदेश लागु करीत आहे. सदर आदेशाच्या अंमलबजावणीसाठी नोटीस देण्यास पुरेसा कालावधी नसल्याने व परीक्षा सुरळीत पार पाडण्याचे दृष्टीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार सदर आदेश एकतर्फी काढण्यात येत आहे. सदर आदेशाची प्रसिध्दी पोलीस अधिक्षक, जालना यांनी ध्वनिक्षेपकाद्वारे करावी. हा आदेश दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजीचे सकाळी ७.00 वाजेपासून सायंकाळी ७.00 वा. पर्यंत अंमलात राहील.